भारत निवडणूक आयोग,नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र.इएलअे-२०११/प्र.क्र.५०८/११/३३ दिनांक १४ जुलै २०११ अन्वये दि.१ जानेवारी २०१२ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

छायाचित्र मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा कार्यक्रम २०१२

| अ.क् | पुनरिक्षण कार्यक्रमाचे टप्पे | कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादयांची प्रसिध्दी | दि. १ ऑक्टोंबर, २०११ (शनिवार) |
| २ | दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी | दि १ ऑक्टोंबर, २०११ (शनिवार) ते ०१ नोंव्हेंबर, २०११ (मंगळवार) |
| ३ | छायाचित्र मतदार यादीतील संबधित यादी भागाच्या प्रतीचे ग्रामसभा, स्थानिक संस्था, मोहल्ला सुधार समिती येथे वाचन करणे व नावांची पडताळणी करणे | दि. ८ आक्टोंबर, २०११ (शनिवार) पासून दि ११ ऑक्टोंबर २०११ (मंगळवार) पर्यन्त |
| ४ | राजकीय पक्षांचे मतदान केंद्रस्तरीय अभिकर्ते (Booth Level Agents) यांचे उपस्थितीत दावे व हरकती स्विकारण्याची विशेष मोहिम | दि ९ ऑक्टोंबर, २०११ (रविवार) दि १६ ऑक्टोंबर, २०११ (रविवार) आणि २३ ऑक्टोंबर, २०११ (रविवार) |
| ५ | दावे व हरकती निकालात काढणे | दि ०१ डिसेंबर, २०११ (गुरुवार) |
| ६ | डाटाबेसचे अद्यावतीकरण, छायाचित्र एकत्रीकरण, कंट्रोल टेबलचे अद्यावतीकरण व पुरवणी यादीची तयारी व छपाई | दि ०१ डिसेंबर, २०११ (गुरुवार) पासून दि ३१ डिसेंबर, २०११ (शनिवार) पर्यन्त |
| ७ | अंतिम मतदार यादी प्रसिध्दी | दि ५ जानेवारी, २०१२ (गुरुवार) |

उपरोक्त कार्यक्रमांतर्गत मतदार यादीत नवीन नावाचा समावेश करणे, कुटुंबातील मृत व्यक्ती किंवा दुबार आलेली नावे वगळणे, एका विधानसभा मतदार संघाच्या एका यादी भागातून दुस-या यादी भागात स्थलांतर झाले असेल तर संबंधित व्यक्तीने त्याच्या वास्तव्याच्या विधानसभा मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयांत संपर्क साधून खाली नमूद केलेल्या विहित नमुन्यांत अर्ज सादर करणे आवश्यक असेल.

<u>नमुना क्र.६</u>

एखाद्या व्यक्तीच्या वयास दि.१/१/२०१२ या दिनांकास वयाची १८ वर्षे पूर्ण झाली असतील अथवा एखाद्या व्यक्तीचे नाव त्याच्या वास्तव्याच्या विधानसभा मतदार यादीमध्ये समाविष्ट नसेल तर अशा व्यक्तीने आपले नाव दाखल करण्यासाठी नमुना क्र.६ मध्ये त्या विधानसभा मतदार संघाच्या मतदार नोंदणी अधिका-याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

नमुना क्र.६ अ :- एखादा भारतीय नागरीक परदेशांत वास्तव्य करीत असेल व त्याच्या नावाचा समावेश तो भारतामध्ये वास्तव्यास असलेल्या मतदार संघात नसेल तर त्याने मतदार यादींत नाव नोंदणीसाठी नमुना क्र.६ अ मध्ये तो ज्या देशामध्ये सध्या वास्तव्यास आहे त्या देशाच्या भारतीय दूतावासामार्फत अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

नमुना क्र.७

विधानसभा मतदार यादीमध्ये समावेश असलेल्या नावाबद्दल आक्षेप असल्यास किंवा मतदार यादीमध्ये समाविष्ट असलेली व्यक्ती मृत असल्यास अशा व्यक्तीचे नाव वगळण्यासाठी या नमुन्यामध्ये अर्ज करणे आवश्यक आहे.

नमुना क्र.८

मतदार यादीमध्ये समाविष्ट असलेल्या नावामध्ये दुरुस्ती करण्यासाठी किंवा मतदार ओळखपत्रासाठी फोटो देण्यासाठी नमुना क्र.८ अर्ज सादर करावा

नमुना ८ अ

एका विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादी भागातून त्याच मतदार संघाच्या दुस-या मतदार यादीमध्ये एखाद्या मतदार व्यक्तीचे स्थलांतर झाले असेल तर त्यासाठी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे नमुना नं.८ अ मध्ये अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

एकूण मतदार :- ठाणे जिल्हयामध्ये एकूण २४ विधानसभा मतदार संघ समाविष्ट असून या २४ विधानसभा मतदार संघामध्ये एकूण ३५,५३,६९६ पुरुष,३२,८८,०२९ स्त्री असे एकूण ६८,४१,७२५ मतदार आहेत. त्याचप्रमाणे १६३३ सैनिक मतदार आहेत.

घरोघरी मतदार नोंदणी मोहिमे अंतर्गत मतदार नोंदणीचे काम सुरळीतरीत्या पार पाडण्यासाठी जिल्हयांत एकूण ६९५३ केंद्रस्तरीय मतदार अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच जिल्हयांत मतदार नोंदणीच्या कामात सहाय्य करण्यासाठी २८७८ पदनिर्देशित ठिकाणे विधानसभा मतदार संघनिहाय निश्चित करण्यात आली असून २८७८ पदनिर्देशित अधिका-यांची नियुक्ती संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचेमार्फत करण्यात आली आहे.